सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/~~प्रासुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९६ ठ. क्र. १३१
दि. २४/०६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



दिनांक २५ जून २०१५ रोजी दिल्ली येथे मा.प्रधानमंत्री यांच्या हस्ते स्मार्ट सिटी, अटल मिशन योजना व प्रधान मंत्री आवास योजना या तीन प्रकल्पांचा शुभारंभ करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत वरील तिनही प्रकल्पा बाबत सविस्तर अशी चर्चा करण्यात येऊन त्याअनुषंगाने सोलापूर शहराचा केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटीच्या प्रकल्पामध्ये भाग घेण्याकरिता महासभेची मान्यता व अनुषंगिक ठराव अत्यावश्यक असल्याने त्याबद्दल विशेष महासभा बोलावून त्यावर सर्व पदाधिकारी व सर्व नगरसेवकांसमवेत चर्चा करुन सोलापूर शहराचा स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये समावेश करण्याकरिता महासभेचा ठराव पारित करणेकामी आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदर केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सोलापूर महानगरपालिका सदर योजनेत सहभागी होण्यासाठी तयार असून, त्यासाठी केंद्र सरकारनी घातलेल्या अटी महानगरपालिकेस मान्य आहेत. व या योजनेअंतर्गत विविध बाबींची पुर्तता करणेस महानगरपालिका तयार आहे. यास ही सभा मान्यता देत आहे. या बाबतीत वेळोवेळी पत्रव्यवहार करणे, निर्णय घेणे बाबत कार्यवाही करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येत आहेत. तसेच वेळोवेळी घेतलेले निर्णय मा.म.न.पा. सभे समोर सादर करण्यात यावेत.

O/C

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका